From the house of
HOME CABLE
HOME NET

# होम टाइम्स

मराठी

साप्ताहिक शनिवार

FREE COPY

RNI No.: MAHMAR/2016/66872 | Post Reg. No. MNE/374/2019-21 | Volume IX | Issue 24 | Saturday, 9th Sept 2023 to 15th Sept 2023 | Price ~~Rs.~~3/-

www.hometimes.in www.facebook.com/hometimes.in www.twitter.com/hometimes_news hometimes.in write2us@hometimes.in

# मुलुंडमध्ये उत्साहात पार पडला कृष्ण जन्माष्टमीचा सोहळा

■ **होम टाइम्स टीम**

गुरुवारी देशभरात कृष्ण जन्माष्टमीचा सोहळा पार पडला. यावेळी ठिकठिकाणी दहीकाला उत्सव देखील आयोजित करण्यात आला. मुलुंडमध्ये देखील कृष्ण जन्माष्टमीचा उत्सव सर्वत्र पाहायला मिळाला. मुलुंडच्या विविध मंदिरांमध्ये यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले होते.

ज्याप्रमाणे देशभरात कृष्ण जन्माष्टमीची धामधूम होती, त्याचप्रमाणे मुलुंडमध्ये देखील कृष्ण जन्माष्टमीची धामधूम पाहायला मिळाली. मुलुंड मध्ये तर एक दिवस आधीपासूनच भाविकांकडून कृष्ण जन्माष्टमीचा सोहळा सुरू करण्यात आला होता मुलुंडच्या झव्हेर रोड परिसरात असलेल्या राधाकृष्ण मंदिरामध्ये बुधवारी भजन कीर्तन करण्यात आले. गुरुवारी कृष्ण जन्माष्टमीचा सोहळा पार पडला. कृष्ण मूर्तींची सजावट करण्यात आली. कृष्णाचा पाळणा देखील करण्यात आला. पुढील सहा दिवस या मंदिरात या कृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.



मंदिरात जाऊन बाळगोपाळाचे दर्शन घेणाऱ्या भाविकांची रांग लागलेली असते. गुरुवारी विविध गोविंदा पथके दहीहंडी फोडण्यासाठी रस्त्यावर फिरताना दिसून आली. मुलुंडमध्ये पूर्व आणि पश्चिम परिसरात विविध ठिकाणी मुख्य चौकांमध्ये दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आले होते. लाखोंची बक्षीस या दहीहंडीच्या निमित्ताने देण्यात आली. या सोबतच मुलुंडच्या बाबाजी की झोपडी या ठिकाणी मंदिरात देखील कृष्ण जन्माष्टमीचा सोहळा पार पडला. रात्री उशिरापर्यंत या ठिकाणी भाविकांकडून भगवान कृष्णाची पूजा अर्चा केली गेली.

# ढाक्कुमाकुमच्या ठेक्यावर गोविंदांचा जल्लोष

## मुलुंडमध्ये पहायला मिळाला थरांचा थरार

■ **होम टाइम्स टीम**

**गुरुवारी मुलुंडमधील विविध संघटना आणि राजकीय पक्षांनी दहीहंडीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला. मुलुंडभर हा थरथराट दिसून आला. ३० ते ३५ ठिकाणी दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. 'बोल रे बजरंग बली कि जय', 'गोविंदा आला रे आला' अशा घोषणांनी मुलुंडमधील सर्व परिसर दुमदुमून गेला होता. अनेक ठिकाणी वेगवेगळ्या गोविंदा पथकांनी हंडीला उत्साहात सलामी दिली आणि अनेक बक्षिसे जिंकली. या काळात नागरिकांमध्येही मोठा उत्साह दिसून आला.**



**मुलुंडच्या सर्वोदय नगर परिसरात मुलुंड सर्वोदय उत्सव विकास समितीतर्फे दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. आमदार मिहीर कोटेचा, माजी नगरसेवक नील सौमय्या, केतन कोटक, यांच्यासह या दहीहंडीत विशेषत: मुंबई व परिसरातील गोविंदा पथकांनी सहभाग नोंदवला. या समितीतर्फे एक लाख ११ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. सर्वोदय नगर येथे आयोजित दहीहंडी सांताक्रूझ वाकोला येथील गोविंदा पथकाने फोडली.**



**मुलुंड पश्चिम पीके रोड येथील श्री स्वामी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. जिथे मटका फोडणाऱ्या गोविंदा पथकाला बक्षीस आणि ट्रॉफी देण्यात आली. यावेळी गोविंदा पथकांनी हंडीला सलामी देऊन या कार्यक्रमाचा आनंद लुटणाऱ्या नागरिकांनीही गोविंदा पथकांचे मनोबल वाढवले.**

(पान ३ व ५ वर)



|| जय दरियालाल || || जय जलाराम ||

# श्री कच्छी लोहाणा महाजन-मुलुंड

आर.आर.टी. रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०० ०८०.



## श्री कच्छी लोहाणा महाजन-मुलुंड आणि लायनलेडी ऑक्झिलरी मुलुंड तर्फे आयोजित

# मोफत कॅन्सर स्क्रीनींग शिबीर

**तारीख : बुधवार, १३ सप्टेंबर २०२३ रोजी**

वेळ : दुपारी १.०० वाजल्यापासून सायं. ४.०० वाजेपर्यंत

**स्थळ :** पवाणी बेंक्वीट हॉल, पहिला मजला,
श्री कच्छी लोहाणा महाजनवाडी, आर.आर.टी. रोड, मुलुंड (पश्चिम)

## नोंदणी

सोमवार, ११ सप्टेंबर २०२३ पर्यंत करणे आवश्यक आहे.



१. कॅन्सर तपासणी शिबीर
२. कॅन्सर पेशंट एड असोसिएशन
३. महिला गायनॅक- सर्वाइकल / स्तन कॅन्सर/ पॅप स्मीअर (PAP SMEAR)
४. सर्जन
५. लिम्फ नोड्स
६. दंत चिकित्सक : तोंडाचा कॅन्सर / ओरल कॅव्हीटी
७. जेंटस डॉक्टर - प्रोस्टेट / टेस्टीक्युलर
८. रक्त तपासणी तंत्रज्ञ - WBC/ हिमोग्लोबीन
गरज भासल्यास N.M लॅबमध्ये मोफत मेमोग्राफी सुविधा उपलब्ध



|| जय झुलेलाल ||

# ढाक्कुमाकुमच्या ठेक्यावर गोविंदांचा जल्लोष (पान १ वरून)



मुलुंड येथील केशव पाडा परिसरात भारतीय जनता पक्ष विधानसभा आणि केशव पाडा मित्र मंडळातर्फे दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या दहीहंडी उत्सवात मराठा गोविंदा पथकाने दहीहंडी फोडण्याचा मान मिळविला.





मुलुंड पूर्व येथील वामनराव मुरंजन शाळेजवळील मोकळ्या मैदानात राष्ट्रवादी काँग्रेस पवार गटाचे पुरुषोत्तम दळवी यांनी दहीहंडीचे आयोजन केले होते. यावेळी दहीहंडीसाठी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ उपस्थित होते.





मुलुंड पश्चिम जे. एन. रोड, झव्हेर रोड कॉर्नर येथे सक्षम प्रतिष्ठान आणि मा. नगरसेविका समिता कांबळे यांच्या वतीने विशेष महिला दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. ईशान्य मुंबईचे खासदार मनोज कोटक, स्थानिक आमदार मिहीर कोटेचा, विनायक कामत, शरद कांबळे, श्रद्धा गंभीर, आदी यावेळी उपस्थित होते. या ठिकाणी गोविंदा पथकाने ७ थरांची सलामी दिली आणि ११ हजार रुपयांचे बक्षीसही जिंकले. नृत्य, खेळ आणि संगीतासोबतच डोळ्यांवर पट्टी बांधलेल्या महिलांसाठी दहीहंडी फोडण्याची स्पर्धाही आयोजित करण्यात आली होती. मागील ८ वर्षांपासून असाच कार्यक्रम मा. नगरसेविका समिता कांबळे आयोजित करत आहेत.



सुरेशदादा बारकू पाटील प्रतिष्ठानतर्फे दरवर्षीप्रमाणे आर. आर. टी. रोडवर दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. गोविंदा पथकाच्या वतीने सहा थरांची सलामी देण्यात आली. येथील दहीहंडी फोडणाऱ्या गोविंदा पथकाला ९९ हजार ९९९ रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले. यावेळी अनेक नेत्यांनी आपली उपस्थितीही नोंदवली होती.




मुलुंड पश्चिम एमजी रोडवर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडूनही दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. जिथे ५५ हजार ५शे ५५ रुपयांचे बक्षीसही ठेवण्यात आले होते.




मेहुल सर्कल येथे सेवा फाऊंडेशनच्या वतीने धमाल दहीहंडी उत्सव २०२३ चे आयोजन करण्यात आले होते. मुंबई काँग्रेसचे कार्याध्यक्ष चरणसिंग सप्रा गेल्या १३ वर्षांपासून येथे दहीहंडी उत्सवाचे आयोजन करत आहेत. यावेळी काँग्रेसचे आमदार भाई जगताप, उत्तम गिते, आर.आर. सिंग आदी उपस्थित होते. या फाऊंडेशनतर्फे विजेत्या दहीहंडी पथकासाठी २ लाख २२ हजार २२२ रुपयांचे बक्षीसही ठेवण्यात आले असून येथे सात फूट उंचीचे मडके ठेवण्यात आले होते.



RFC
RAHUL'S
The Taste Destination
BARBEQUE ROLLS | PIZZA | PASTA
LEBANESE | CHINESE | JUICE
+91 8591692727
rahulsfoodcourtmulund
Shop no 16, Golden Willows building, Next to Mann Punjab Hotel,
Cypress, Mulund (W), Mumbai - 400080
WE SERVE JAIN FOOD

# ढाक्कुमाकुमच्या ठेक्यावर गोविंदांचा जल्लोष (पान १ वरून)



मुलुंड पश्चिम एसएल रोडवर बाल गोपाळ मित्र मंडळातर्फे दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. जिथे हंडीला ६ थार लावून सलामी देण्यात आली आणि हंडी फोडणाऱ्या संघाला ट्रॉफी व बक्षीस देण्यात आले.



ठाकरे गटाकडून दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. दुसरीकडे शिवसेना सचिव संजय मशिलकर यांच्या पुढाकाराने मुलुंडमध्ये ७ लाख रुपयांची सर्वात मोठी दहीहंडी आयोजित करण्यात आली होती. मुलुंड पश्चिम एम. जी. रोड येथे आयोजित केलेल्या या दहीहंडीला राजकीय पक्षांच्या नेत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदवली.



मुलुंड पश्चिमेला असलेल्या स्वप्ना नगरीतही आरपीआय आठवले गटाकडून दहीहंडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जिथे नागरिक लावणीच्या तलावावर नाचताना दिसले. यावेळी परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवला होता.



मुलुंड कॉलनी सर्कलजवळ श्रेष्ठ नेत्र प्रतिष्ठानतर्फे दहीहंडीचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता. यावेळी काँग्रेस नेते भाई जगताप, मुंबई काँग्रेस कार्यध्यक्ष चरणसिंह सप्रा, संघटक विठ्ठल सातपुते यांच्यासह काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित होते. यावेळी लोकांची मोठी गर्दी दिसून आली. गेल्या १२ वर्षांपासून याच पद्धतीने दहीहंडी उत्सवाचे आयोजन श्रेष्ठ प्रतिष्ठानतर्फे करण्यात येत आहे.

# रस्त्यावर कचरा दिसल्याने मुख्यमंत्र्यांचा सात अधिकाऱ्यांवर कारवाईचा आसूड

■ **होम टाइम्स टीम**

रस्त्यावरील कचरा उचलण्यास हयगय करणाऱ्या ई प्रभाग सहाय्यक आयुक्तांसह सात अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या करण्यात आलाय आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नजरेस हा कचरा आल्याने त्यांनी अधिकाऱ्यांची झाडाझडती घेऊन थेट बदल्यांची कारवाई केली. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने करण्यात आलेल्या या कारवाईचा धसका मुलुंडच्या टी वॉर्ड अधिकाऱ्यांनीही घेतला. त्यामुळेच आपलेही पितळ उघडे पडू नये म्हणून त्यांनी मुलुंडमधील मुख्य रस्त्यांसह गल्लोबोळातुन कचरा उचलण्याचे काम सुरु केले आहे.

माझगाव डॉक येथील एका कार्यक्रमातून परतत असताना राज्याच्या मुख्यमंत्र्यांना वाटेत कचरा साचलेला दिसली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी तातडीने महापालिका आयुक्तांना बोलावून मुख्य चौक तसेच अंतर्गत रस्त्यांची स्वच्छता व कचरामुक्त करण्याचे आदेश दिले. एवढेच नाही तर या रस्त्यांवरील अस्वच्छतेमुळे ७ अधिकाऱ्यांच्या बदल्याही करण्यात आल्या आहेत. त्यात ई प्रभाग सहाय्यक आयुक्त अजयकुमार यादव, विकास सामंत, मिलिंद जोशी, जयवंत परहार आदींचा समावेश आहे. या अधिकाऱ्यांची मुंबईतील ७ झोनमध्ये

## मुलुंड टी-वॉर्डचे अधिकारीही आले भानावर

बदली करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या या आदेशानंतर प्रत्येक प्रभागातील सफाई कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात आली असून, त्यांना रस्त्यांसह मुख्य मार्गांची स्वच्छता करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मुलुंड आणि संपूर्ण मुंबईत केलेल्या स्वच्छतेचा अहवाल येत्या सात दिवसांत आयुक्तांना सादर करण्यास सांगितले आहे. मुख्यमंत्र्यांच्या या आदेशानंतर मुलुंडमध्येही टी वॉर्डाकडून रस्त्यांवरील कचरा उचलून स्वच्छ करण्याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. एवढेच नव्हे तर नागरिकांकडून होणारा कचरा व इतर समस्यांकडेही विशेष लक्ष दिले जात असून मुलुंडमध्ये सर्वत्र स्वच्छता करण्यात येत असून, नागरिकांना कचरा दिसल्यास त्याबद्दल टी-वॉर्डला माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

Volume : IX | Issue : 24 होम टाइम्स

# सं | पा | द | की | य ▪ हेमांशू कोठारी

## माझा गणपती, पर्यावरण रक्षक गणपती

श्रावण महिना सुरु झाल्याने या महिन्यात विविध सणांची रेलचेल सुरु झाली असून नुकताच दहीहंडी हा उत्सव पार पडला आहे. आता सण प्रेमींना गणेशोत्सवाची आस लागलेली आहे. राज्यभरात गणपतीची प्रतीक्षा केली जात आहे. राज्यभरात हा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. दहा दिवस सर्वत्र उत्सवाची धूम सुरु असते. सगळीकडे आनंदीआनंद पाहायला मिळतो. आता तर हा सण देशभरातच नव्हे तर जगभरात पोहचला आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशात महाराष्ट्रातून गणेश मुर्त्या निर्यात होत आहेत. त्यामुळे राज्यातला हा सण आता ग्लोबल झाला आहे. अशावेळी या सणाचे उगम स्थान असलेल्या महाराष्ट्राची जबाबदारी वाढली आहे. हा उत्सव पूर्णतः इको फ्रेंडली व्हावा अशी गरज निर्माण झाली आहे. कारण या सणात गणेश भक्तांकडून ज्या गणेश मुर्त्या बसविल्या जातात त्या प्लास्टर ऑफ पेरिसपासून बनविल्या जातात. हे मटेरियल मुर्त्या बनविण्यासाठी अत्यंत सुलभ असले तरी त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी दूषित होते. ही माती पाण्यात न विरघळणारी असल्याने तिच्यामुळे पाण्यातील नैसर्गिक झऱ्यांना बाधा निर्माण होते. विहिरी, तलाव, नद्यांमध्ये अशा प्रकारच्या मुर्त्या विसर्जित केल्याने ही चिकट आणि न विरघळणारी माती जमिनीतून येणाऱ्या झऱ्यांमध्ये जाऊन बसते. त्यामुळे नदी, विहिरी आणि तलावांचा जमिनीमधील नैसर्गिक पाण्याचा स्रोत बंद झाल्याने हे पाणवठे धोक्यात येतात. कालांतराने ते आटू लागतात. तसेच मूर्त्यांना लावण्यात आलेल्या रंगांमध्ये विविध प्रकारचे हानिकारक केमिकल असल्याने त्याचा पाण्यातील जीव सृष्टीवर परिणाम होतो. ही जीवसृष्टी सुद्धा धोक्यात येते. पाणी आणि पाण्यातील जीवसृष्टीच धोक्यात येणे हे मानवाला परवडणारे नाही. त्यामुळे पर्यावरणाच्या रक्षणासाठी लोकांनी विचार करणे गरजेचे झाले आहे. प्लास्टर ऑफ पेरिसच्या माती ऐवजी पर्यावरण पूरक मातीचा वापर करणे आवश्यक आहे. प्लास्टर ऑफ पेरिसला शाडूची माती चांगला पर्याय म्हणून शाबीत झाली आहे. ही माती लवकर पाण्यात विरघळते आणि तिचा पाण्यातील झऱ्यांना बाधाही पोहचत नाही. त्यामुळे पाण्याचे नैसर्गिक झरे बंद होत नसल्याने नदी. तलाव, विहीरींसारख्या पाणवठ्यांना धोका पोहचत नाही. या मूर्त्यांना लावण्यासाठी नैसर्गिक रंगांचा वापर केल्यास पाण्यातील जीवसृष्टीही अबाधित राहू शकते. हा सण १९ सप्टेंबर पासून सुरु होणार असून त्यासाठी सगळीकडे लोकांची खरेदी सुरु झाली आहे, काही जणांची काही दिवसातच सुरु केली जाणार आहे. खरेदीमध्ये सजावटीच्या सामानांपासून, मखरींचा समावेश असणार आहे. पर्यावरणाच्या काळजीमुळे आजच्या युगात अनेकांनी इकोफ्रेंडली मखर, सजावटीचा वापर करायला सुरुवात केली आहे. याबाबत लोकांमध्ये बऱ्यापैकी जागृती येत आहे. मात्र त्यामध्ये आणखी मोठी वाढ होण्याची आवश्यकता आहे. आपण जे मखर आणि सजावटीचे साहित्य घेतो ते पर्यावरणात सहजपणे मिसळणारे असावे, त्यापासून जीवसृष्टीला कोणताही धोका पोहचता कामा नये. थर्माकॉल, सिंगल युज प्लास्टिक वापरावर शासनाने बंदी घातलेली असली तरी अशा वस्तू बाजारात विक्री होत असल्याचे दिसून येते. त्याचा वापर टाळणे आवश्यतक आहे. शासनाकडून बंदी असतानाही अशा वस्तू वापरल्या जात असल्याने ते पर्यावरणासाठी घातक आहे. आपणच या वस्तूंचा वापर करणे थांबविले तर त्या बाजारात दिसणारच नाहीत. त्याची मागणी नसल्याने निर्मितीही होणार नाही. म्हणूनच ही जबाबदारी लोकांचीही आहे. त्यांनीही त्यांचे पर्यावरण रक्षणाचे कर्तव्य पाळायला हवे. अप्लाय घरात बसणाऱ्या बाप्पाला निसर्ग आवडतो, निसर्ग देवता म्हणून बाप्पाकडे पाहिले जाते. मग निसर्गाची हानी होईल असे कृत्य आपल्याकडून घडणे त्याला कसे आवडेल? त्यासाठी आताच आपण त्याला आवडणाऱ्या नैसर्गिक साहित्यांचा वापर करून हा सण अधिक पवित्र करूयात. निसर्गाची काळजी घेऊन जबाबदार नागरिकाचे कर्तव्य पार पाडूयात. घरगुती गणेश भक्तांनी या कर्तव्यात कसूर करता कामा नये. कारण तोच या उत्सवाचा खरा आधार आहे. त्यामुळे किमान त्याने घरात बसविलेली गणेश मूर्ती कृत्रिम तलावात अथवा घराच्या पाण्यात विसर्जित कराव्यात, गणपतीसमोरील निर्माल्य पालिकेच्या ताब्यात द्यावे अथवा घरातील बागेत त्याचे खत तयार करून ते झाडांना वापरावे. इकोफ्रेंडली सजावट करावी, तसेच मूर्तीभोवती वह्या, पेन, पेन्शील अथवा इतर शालोपयोगी अथवा गरीब मुलांना वापरता येतील अशा वस्तूंची सजावट करून विसर्जनानंतर या साहित्यांचे वाटप गरीब, आदिवासी पाडे, झोडपडपट्यांमधील गरजू मुलांमध्ये करावे. मुलुंडमधील काही गणेश भक्तांकडून अशा प्रकारच्या साहित्यांपासून सजावट करून शेवटी त्यांचे वाटप गरजुंना केले जाणारे पाऊल उचलले आहे. इतरांनीही याचे अनुकरण करणे गरजेचे आहे. चला तर मग यंदा माझा गणपती, पर्यावरण रक्षक गणपती बसवून पर्यावरणाचे रक्षण करूयात.

# आदर्श शिक्षक महापौर पुरस्कारासाठी ५० शिक्षकांची निवड

## मुलुंडमधील तीन शिक्षक ठरले पुरस्काराचे मानकरी



अनुजा साबळे



विठ्ठल वाळुंज



आसीस शुक्ला

▪ **होम टाइम्स टीम**


मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक, माध्यमिक, खासगी तसेच अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या कामाचा गौरव करण्यासाठी महानगरपालिकेने आदर्श शिक्षक महापौर पुरस्कारासाठी ५० शिक्षकांची निवड केली आहे. पालिकेकडे पुरस्कारासाठी आलेल्या १४७ प्रस्तावांमधून विविध निकषांच्या आधारे या ५० शिक्षकांची निवड करण्यात आली. पुढील आठवड्यात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. ११ हजार रुपये, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, सुवर्णपदक आणि फेटा असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मुलुंडकरांसाठी एक अभिमानाची गोष्ट आहे. कारण मुलुंड मधील तब्बल तीन शिक्षक या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

यंदा जाहीर करण्यात आलेल्या आदर्श शिक्षक महापौर पुरस्कारांसाठी मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, इंग्रजी शारीरिक शिक्षण, चित्रकला, कार्यानुभव, संगीत, विशेष शाळा आदी माध्यमांतून एकूण ५० शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. १० वर्षे निष्कलंक सेवा देणे, वर्गाची पटनोंदणी व गळती रोखण्यासाठी प्रयत्न करणे, शैक्षणिक कारकिर्दीत केलेले उल्लेखनीय काम, विद्यार्थ्यांसाठी केलेले लेखन कार्य, विविध शैक्षणिक प्रकल्पात घेतलेला सहभाग व मिळालेले पुरस्कार, अध्यापन पद्धती, अविकसित विभागातील विद्यार्थ्यांसाठी केलेले विशेष कार्य आदी निकषांच्या आधारे आदर्श शिक्षक महापौर पुरस्कारासाठी शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. मुंबई महानगरपालिकेतर्फे १९७१ पासून आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार दिला जातो.

मुंबई महानगरपालिकेच्या वतीने शिक्षक विभागाच्या ५० शिक्षकांना आदर्श शिक्षक महापौर पुरस्कारदेण्यात येणार आहे. त्यामध्ये मुलुंडमधील तीन शिक्षकांचा समावेश आहे.

### मुलुंडमधील आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी

- **मराठी माध्यम**
  **अनुजा साबळे** – मुंबई पब्लिक स्कूल, गव्हाण पाडा
- **हिंदी माध्यम**
  **आसीस रामजी शुक्ला** – मुलुंड विना नगर
- **मराठी माध्यम**
  **विठ्ठल वाळुंज** – मुलुंड विद्या मंदिर



# फ्लोअरिंग सोल्युशन्स

## गणपती डेकोरेशन

## होलसेल दरात उपलब्ध






आम्ही उच्च दर्जाचे ताडपत्री आणि शेड नेट तयार करतो. आमची डोरमॅट, कुशन मॅट आणि एस-मॅटची एजन्सी आहे. घरे आणि कार्यालयांसाठी, आम्ही कृत्रिम ग्रास, न विणलेले कार्पेट आणि पीव्हीसी कार्पेट देखील विकतो.






सणासुदीच्या वेळी कृत्रिम फुलांची कमान आणि ग्रीन मॅटचा बॅकड्रॉप सुध्दा उपलब्ध करून देतो.
सर्व उत्पादने घाऊक दरात उपलब्ध आहेत.

पत्ता : बी-१४ सुनीता आनंद पॅलेस, बाल राजेश्वर रोड, वैशाली नगर, मुलुंड (पश्चिम), मुंबई

संपर्क : योगेश मजिठिया : 9819243679 / करण मजिठिया : 7977009021

# जैन धर्मियांची मुलुंडमध्ये अद्वितीय महा रथयात्रा



**दहा हजारांहून अधिक समाजबांधवांनी घेतला सहभाग**





■ **होम टाइम्स टीम**

मुलुंड मध्ये जैन धर्मियांतील अचलगच्छ समाजाद्वारे भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. अद्वितीय महा रथयात्रा असे या रॅलीला नाव देण्यात आले होते. रॅलीत मुंबईभरातून शंभर अचलगज समाजाचे संघ सहभागी झाले होते. दहा हजारांपेक्षा जास्त नागरिक या संपूर्ण रथयात्रेमध्ये सहभागी झाले होते. विविध राजकीय पक्षांची उपस्थिती देखील या यात्रेमध्ये लाभली होती.

जैन धर्मियांमध्ये अचलगच्छ समाजाचा एक वेगळे स्थान आहे. या समाजातील नागरिकांना एका व्यासपीठावर आणण्यासाठी समाजाकडून रविवारी मुलुंड मध्ये एक भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मुलुंड मधील जैन देरासर मधून या रॅलीची सुरुवात करण्यात आली होती आणि नंतर याच ठिकाणी रॅलीची सांगता देखील करण्यात आली. या भव्य रॅलीत अचलगच्छ समाजाचे सर्व बांधव उपस्थित होते. ईशानी मुंबई खासदार मनोज कोटक, आमदार मिहीर कोटेचा यांनीही या रॅलीत सहभाग नोंदवला होता. तसेच इतर विविध राजकीय नेते देखील या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. महत्त्वाचे म्हणजे पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर अचलगच्छ समाजाचे बांधव एकत्र आलेले पाहायला मिळाले. त्यामुळे या रॅलीला भव्यतेचे स्वरूप आले होते. त्याच प्रमाणे या रॅलीमध्ये चार मोठे रथ दाखल करण्यात आले होते. मुलुंडच्या प्रियदर्शनी क्रीडा संकुल येथील मोकळ्या मैदानामध्ये या रॅलीतील सर्व अचलगच्छ समाजाच्या बांधवांना एकत्र करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये आचार्य महोदयसागर सूरीश्वरजी, गणीवरी श्री उदयरत्नसागरजी म.सा., प्रखर वक्ता मुनिश्री गुणवल्लभसागरजी म.सा. तसेच मुलुंड मधील अनेक जैन मुनींनी या रथयात्रेत आपली उपस्थिती दर्शविली. अचलगच्छ जैन समाज मुलुंडच्या वतीने या रॅलीचे आयोजन करण्यात आके होते. अद्वितीय महा रथयात्रा असे नाव या रॅलीला देण्यात आले होते.

# मुलुंडमध्ये पीएनजी गॅसची लाईन फुटली

## मुलुंडसह ठाण्यातील ग्राहकांना बसला फटका

■ **होम टाइम्स टीम**

**लुंड पश्चिमेकडील एम टी अग्रवाल रुग्णालय परिसरामध्ये महानगर गॅसची पाईपलाईन फुटल्याने काही काळ भयाचे वातावरण निर्माण झाले होते. गुरुवारी सकाळच्या सुमारास ही घटना घडली. रुग्णालय परिसरामध्ये जमिनीचा काही भाग कोसळल्याने ही घटना घडल्याची माहिती समोर आली.**

याबाबतची अधिक माहिती अशी की, मुलुंड मधील महापालिका एम टी अग्रवाल या महापालिकेच्या रुग्णालय परिसरात उग्र वास येत असल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली होती.

त्यानुसार अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली असता तिथे जमिनीत असलेल्या गॅसच्या पाईप लाईनमधून गॅसची गळती होत असल्याचे निदर्शनास आले.

महानगर गॅसची पाईपलाईन फुटल्याने तिच्यातून पीएनजी (घरगुती) गॅसची गळती होत होती. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर लागलीच महानगर गॅस कर्मचाऱ्यांच्या मदतीने सुरक्षेच्या कारणास्तव या ठिकाणचा गॅस पुरवठा खंडित करण्यात आला. ज्यामुळे मुलुंड पूर्व, मुलुंड पश्चिम आणि कोपरी परिसरातील रहिवाशांना काही तास स्वयंपाकी गॅसचा पुरवठा होऊ शकला नाही. मात्र काही तास केल्यानंतर गॅस कर्मचाऱ्यांनी गॅसची लाईन दुरुस्त केली आणि गॅस पुरवठा सुरु करण्यात आला. वेळीच अग्निशमन दलाला माहिती दिल्यामुळे तसेच महानगर गॅसचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचल्यामुळे पुढील संभाव्य अनर्थ टळला आणि गॅस पुरवठा सुरळीत झाला.

# मुलुंडमध्ये वीज मीटर केबिनला लागणाऱ्या आगीचे सत्र सुरूच

## गिरीजाबाई सोसायटीनंतर लोक एव्हरेस्ट सोसायटीतही लागली आग

■ होम टाइम्स टीम

मुलुंड पूर्वेकडील गिरीजाबाई को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमध्ये मीटर केबिनला लागलेल्या आगी नंतर आता पुन्हा एकदा मुलुंड पश्चिमेकडील लोक एव्हरेस्ट या इमारतीच्या मीटर केबिनला आग लागली. ही आग विझवण्यासाठी तब्बल चार अग्निशमन दलाच्या गाड्यांना पाचारण करावे लागले. चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्यानंतर लागलेली आग विझविण्यात यश आले. आल्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

मुलुंड पश्चिमेकडील लोक एव्हरेस्ट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या मीटर केबिनला बुधवारी आग लागली. सकाळची वेळ असल्यामुळे या ठिकाणी नागरिकांची वर्दळ होती. केबिनला लागलेल्या आगीमुळे लगेच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. तासाभरात त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. वीज मीटर केबिनला आग लागण्याचे प्रकार सध्या वाढताना दिसून येत आहेत. मुलुंडच्या पूर्वेकडील गिरिजाबाई को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमध्ये अशाच प्रकारे रात्रीच्या वेळी मीटर केबिनला आग लागली होती. ही आग वेळीच विझविल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. मात्र ही घटना ताजी असताना बुधवारी पुन्हा या घटनेची पुनरावृत्ती झाली. सकाळच्या सुमारास लोक एवरेस्ट उच्चभ्रू रहिवासी इमारतीच्या मीटर केबिनला बुधवारी आग लागली. मीटर केबिनला आगी लागण्याच्या घटना वाढताना दिसून येत आहेत, या पार्श्वभूमीवर महावितरणने पालिका प्रशासन आणि को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटीला काही नियमावली जारी केलेल्या आहेत. या आधी मुंबई, मुलुंड आणि आसपासच्या परिसरात अशा घटना घडलेल्या आहेत. त्यात अनेकांचे जीव देखील गेलेले आहेत. बहुतेक वेळा या मीटर केबिन मुख्य प्रवेशद्वाराच्या जिन्याच्या बाजूलाच असतात. त्यामुळे मीटर केबिनला आग लागल्यानंतर नागरिकांना बाहेर काढताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते तसेच आगीचा भडका हा थेट वरच्या मजल्यांवर जातो. त्यानंतर ही आग भडकत जाते आणि त्यातून मोठी हानी होते. म्हणूनच महावितरणाने देखिल अशा मीटर केबिनला लागलेल्या आगीची दखल गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

# कांजूर वाहतूक पोलिसांनी साजरा केला जागतिक 'स्वच्छ हवा दिन'

## रिक्षाचालक आणि गोविंदा पथकांना दिले स्वच्छ हवेचे धडे

■ होम टाइम्स टीम

ग्लोबल वॉर्मिंगचा फटकासगळीकडेच दिसू लागला आहे. त्यामध्ये हवेमधून पसरणाऱ्या प्रदूषणाचा जास्त सहभाग आहे. हवेचा संबंध थेट मानव आणि जीव सृष्टीसोबत असल्याने प्रदूषित हवा त्यांच्यासाठी घातक ठरत आहे. त्यामुळे हवा शुद्ध ठेवणे अत्यंत गरजेचे झाले आहे. शुद्ध हवेचे महत्व सगळ्याने ज्ञात व्हावे यासाठी ७ सप्टेंबर हा दिवस जागतिक स्वच्छ हवा दिन म्हणून पाळला जातो. या दिनाच्या निमित्ताने कांजूर वाहतूक पोलीस यांच्या वतीने गोकुळाष्टमीच्या निमित्ताने घराबाहेर पडलेल्या गोविंदा पथकांना तसेच रिक्षाचालकांना या दिनाची माहिती देत हवेचे प्रदूषण कसे कमी करता येईल या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

७ सप्टेंबर हा दिवस जागतिक स्वच्छ हवा दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात ठिकठिकाणी या दिनाच्या निमित्ताने जनजगृतीचे कार्यक्रम घेतले जातात. कांजूर वाहतूक पोलिसांकडूनही अशा प्रकारचा एक विशेष उपक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वाहतूक पोलिसांनी वाहनचालक आणि इतर नागरिकांना हवेचे प्रदूषण कसे रोखता येईल या संदर्भात माहिती दिली. रस्त्यावरून जाणारे वाहने मोठ्या प्रमाणात हवेमध्ये कार्बन डायऑक्साइड सोडत असतात. वाहतूक कोंडीच्या वेळी तसेच सिग्नल लागलेला असताना अनेक वाहन चालक स्वतःचे वाहने बंद न करता चालू ठेवतात. त्यावेळी मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जित होत असतो. ७ सप्टेंबर गोकुळाष्टमीच्या पार्श्वभूमीवर कांजूर वाहतूक पोलीस चौकीच्या वतीने २५ गोविंदा पथक आणि रिक्षाच्या चालकांची एक संयुक्त मीटिंग घेत जागतिक स्वच्छ हवा दिनाचे महत्त्व त्यांना पटवून देण्यात आले. सिग्नल वर थांबलेले असताना आपल्या वाहन इंजिन हे बंद करावे तसेच नेहमी वेळोवेळी पीयूसी चेक करावा, आपल्या वाहनात मधून मर्यादेपेक्षा जास्त कार्बनचे उत्सर्जन होणार नाही याचे दक्षता घ्यावी तसेच वाहतूक कोंडी होणार नाही यासाठी नागरिकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, जेणेकरून अशा प्रकरणामुळे हवेमध्ये कार्बनचे उत्सर्जन मोठ्या प्रमाणात होणार नाही, यासाठी नेमके काय करता येईल याचे मार्गदर्शन केले. तसेच वाहतूक पोलिसांकडून त्यांचे समुपदेशन देखील करण्यात आले. कांजूर वाहतूक पोलीस विभागाचे प्रभारी पोलीस निरीक्षक संपत लोंढे, पीएसआय पवार आणि इतर वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांनी या दिनाच्या निमित्ताने नागरिकांना मार्गदर्शन केले.

# मुलुंडमध्ये ११ वर्षीय मुलीवर शेजाऱ्याने केला लैंगिक अत्याचार

## पोलिसांकडून पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल



■ होम टाइम्स टीम

मुलुंडमध्ये एका ११ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मुलुंड पोलिसांनी आरोपीविरुद्ध पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला असून आरोपीला गजाआड केले आहे.

५ सप्टेंबर रोजी ३४ वर्षीय तक्रारदाराची ११ वर्षीय मुलगी घरी एकटीच होती. याचा फायदा घेत तक्रारदाराच्या घराशेजारी राहणाऱ्या ५५ वर्षीय अल्मेडा गिल्बर्टने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. काही वेळाने तक्रारदार घरी पोहोचल्यावर तिच्या मुलीने ही माहिती तिच्या आईला सांगितली. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर तक्रारदाराने मुलुंड पोलिसांना माहिती दिली. सध्या मुलुंड पोलिसांनी आरोपीविरुद्ध पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला असून आरोपीला अटक करून न्यायालयीन कोठडीत धाडले आहे.

# ई-चलानचे बनावट संदेश पाठवून केली जातेय वाहनचालकांची फसवणूक

## वाहतूक विभागाने केला अलर्ट जारी

■ होम टाइम्स टीम

ई-चलनचे खोटे संदेश पाठवून मुंबईकरांसोबत होत असलेल्या फसवणुकीच्या वाढत्या घटना पाहता वाहतूक विभागाकडून अलर्ट जारी करण्यात आला आहे, एवढेच नाही तर अधिकृत वेबसाइट लिंक व्यतिरिक्त इतर कोणत्याही लिंकद्वारे पैसे न भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मुंबईकरांच्या मोबाईलवर वाहतूक पोलिसांकडून ई-चलान पाठविले जाते. मात्र आता अशा बोगस ई - चलानचा वापर करत काही भामटे वाहन मालकांची फसवणूक करत आहेत. अशा प्रकारे खोटे मॅसेज पाठवून वाहन मालकांची फसवणूक केल्याच्या घटना घडत असल्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. फसवणूक करणारे त्यांच्या वाहन चालकाला ट्रॅफिक पोलिसांचा लोगो लावून अलर्ट एसएमएस पाठवतात. ज्यामध्ये थकबाकीची रक्कम भरण्यास सांगितले जाते. पैसे भरण्यासाठी त्यांच्या मोबाईलवर



डमी लिंक पाठवली जाते. संबंधित व्यक्तीने लिंकवर क्लिक करताच त्याच्या मोबाईल डेटा हॅकर्सच्या ताब्यात जातो आणि त्याद्वारे वाहन चालकाच्या बँक खात्यातून पैसे काढले जातात. अशा फेक मेसेजच्या वाढत्या घटना पाहता मुंबई पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, वाहतूक पोलिसांच्या अधिकृत वेबसाइटवरून सबंधित वाहन मलकांना चालान भरण्यासाठी संदेश पाठवला जातो. या पद्धतीच्या कोणत्याही बनावट लिंकवर किंवा संदेशावर विश्वास ठेवू नका आणि केवळ अधिकृत वेबसाइटद्वारेच चलनाची रक्कम भरा.




जसराज ॲन्टिक ®

सरोज गड़ा (मुलुंड-पूर्व) (राईधणजर/गडशीशा)



सणासाठी विशेष ऑफर

10% to 40% डिसकाउंट

१ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांमध्ये अनेक नवीन डिझाईन्स उपलब्ध

नेत्रदीपक आणि आकर्षक डिझाईन जे मूळ दागिन्यांनाही फिके पाडेल + कुंदन + नेकलेस सेट
पेंटेड ब्युटी लाँग सेट + चंदनहार + दागिने + जवपतला गोल्ड + रोडियम ब्रेसलेट + चेन
आणि अनेक प्रकारचे आलिशान आणि आकर्षक दागिने

जुन्या आणि नवीन सर्व ग्राहकांचे स्वागत आहे

नागरिकांचा विश्वास म्हणजे जसराज ॲंटिकची खास ऑफर

सणाच्या ऑफरवर १०% ते ४०% सूट

Note: Before coming pl buzz on Cell.

CONTACT : GIRISH GADA - 9821376756 SAROJ GADA - 9821854370

# हरवलेले, चोरीला गेलेले मोबाईल परत मिळाले

## मुलुंड पोलिसांनी तक्रारदारांना दिला सुखद धक्का

■ **होम टाइम्स टीम**

नागरिकांचे हरवलेले मोबाईल्स तसेच इतर मुद्देमाल तक्रारदारांना पोलिसांकडून मिळविण्यासाठी किचकट कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागते. कधी कधी ही कायदेशीर प्रक्रिया करताना नागरिकांना अनेक अडचणी येतात, तर काहींना हरवलेली अथवा चोरीला गेलेली वस्तू पुन्हा मिळणार नाही असे वाटते. परंतु मुलुंड पोलिसांनी मात्र फिर्यादिंना सुखद धक्का दिला आहे. हरवलेले अथवा चोरीला गेलेले मोबाईल आणि इतर वस्तू मालकांना परत मिळवून दिल्या आहेत. एका विशेष कार्यक्रमात या वस्तू परत करण्यात आल्या आहेत.



मुलुंड तसेच आसपासच्या परिसरामध्ये मोबाईल चोरी जाण्याचे वाढलेले आहे. मोबाईल हिसकावून पाळणाऱ्या चोरांचा सुळसुळाट झाला आहे. अशाप्रकारे अनेकांचे मोबाईल चोरीला गेलेले आहेत. अनेकांनी त्याबाबत सबंधित पोलीस ठाण्यात तक्रारी नोंदवलेल्या आहेत. मात्र चोरीला गेलेल्या, हरवलेल्या या वस्तू परत मिळतील अशी त्यांना अपेक्षा नव्हती. परंतु मुलुंड पोलिसांनी अशा लोकांना एक सुखद धक्का दिला आहे. चोरीला गेलेले तसेच हरवलेले अनेक मोबाईल प्रकरणाची उकल करून तब्बल १०० मोबाईल त्या त्या मालकाला परत देण्यात आले आहेत. या सर्व गुन्ह्यांची उकल करण्यात मुलुंड पोलिसांना यश आले होते. त्यामुळे त्यांनी एका विशेष कार्यक्रमा अंतर्गत हा मुद्देमाल परत केला. परिमंडळ ७ चे पोलीस उप आयुक्त पुरुषोत्तम कराड, मुलुंड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांतीलाल कोथिंबीरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे मोबाईल्स नागरिकांना परत करण्यात आले. यासोबतच अशा प्रकारच्या गुन्ह्यांपासून वाचण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहणे असल्याचे सांगत ऑनलाईन फसवणुकीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नागरिकांनी काय केले पाहिजे या संदर्भातील माहिती देखील पोलीस उपयुक्त कराड यांनी नागरिकांना दिली. वाढत्या सायबर गुन्हे आणि मोबाईल चोरीच्या गुन्ह्याचा आलेख कसा खाली आणता येईल याकडे लक्ष देण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता असणे तितकेच गरजेचे आहे. बेसावध असणाऱ्या व्यक्तींसोबत अशा घटना घडत असतात. त्यामुळे नागरिक सतर्क राहिले तर अशा घटनांना आळा बसेल अशी प्रतिक्रियाही पोलीस उप आयुक्त कराड यांनी दिली. मुलुंड पोलीस ठाण्याच्या आवारामध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये मोबाईल धारकांना त्यांचे मोबाईल परत करण्यात आले.

# सील झालेल्या फ्लॅट मालकाकडून बँकेच्या दोघा सुरक्षा रक्षकाला मारहाण

## फ्लॅटमध्ये जाण्यास केली होती मनाई

■ **होम टाइम्स टीम**

**बँकेने सील केलेल्या घराबाहेर पहारा देणाऱ्या दोघांची घर मालकाने चांगलीच धुलाई केली. मुलुंडमधील चिंतामणी उद्यानाजवळ असलेल्या साई क्लासिक सोसायटीत ही घटना घडली. पोलिसांनी मारहाण करणाऱ्या घर मालकावर गुन्हा दाखल केला असून या गुन्ह्यात त्याला अटक करण्यात आली आहे.**

याबाबतची समजलेली अधिक माहिती अशी की, मुलुंड पूर्वेतील एम जी रोड परिसरात असलेल्या साई क्लासिक सोसायटीत राजेश पावसकर यांच्या मालकीचा फ्लॅट आहे. त्यावर त्यांनी कोटक महिंद्रा बँकेचे कर्ज काढले होते. मात्र ते कर्ज परत न करता आल्याने बँकेने त्यांच्या फ्लॅट सील केला आहे. सील केलेल्या फ्लॅटवर बँकेने सुमितकुमार कश्यप वय १९ वर्षे आणि राजवर्धन सिंग नामक दोन सुरक्षा रक्षक नेमून त्यांना फ्लॅट बाहेर उभे राहून त्याचे रक्षण करण्याची जबाबदारी दिली. ते दोघे फ्लॅटवर रात्रीचा पहारा करत असताना फ्लॅटचा मालक राजेश पावसकर ५ ऑगस्ट २०२३ रोजी रात्री १:०० च्या सुमारास तेथे आला. त्याने त्याच्या फ्लॅटमध्ये जाण्याचा प्रयत्न केला असता बँकेने नेमलेल्या दोघा सुरक्षा रक्षकांशी त्याचा वाद झाला. या वादात पावसकर याने दोघांना शिवीगाळ करून मारहाण केली. मारहाण झाल्याने दोघेही सुरक्षा रक्षक इमारतीच्या बाहेर आले असता त्यांना गस्त घालत असलेले पोलीस दिसले. त्यामुळे त्यांनी त्यांना मारहाण झाल्याची माहिती दिली. पोलिसांनी इमारतीमध्ये जाऊन पावसकर याला ताब्यात घेतले. त्यावेळी त्याने दारूचे प्राशन केल्याचे उघड झाले. पोलिसांनी त्याच्यावर भारतीय दंड विधान कलम ३२३, ५०४ आणि महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ८५(१) अन्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. पुढील तपास नवघर पोलीस करीत आहे.

# पार्क केलेल्या वाहनांच्या बॅटरी चोरण्यासाठी आलेल्या तरुणाला अटक

■ **होम टाइम्स टीम**

पार्क केलेल्या वाहनांच्या बॅटरी चोरण्याच्या उद्देशाने आलेल्या २२ वर्षीय तरुणाला मुलुंड पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांकडून सध्या त्याची कसून चौकशी केली जात आहे. चौकशीत त्याने आणखी अशा प्रकारचे किती गुन्हे केले आहेत याची माहिती समोर येणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी मुलुंड पोलिसांचे दोन कॉन्स्टेबल सालपा देवी पाडा संकुलात गस्त घालत होते, त्यावेळी पोलिसांना एका व्यक्तीवर संशय आला. जो रिक्षाच्या मागे लपण्याचा प्रयत्न करत होता. पोलिसांनी त्याच्या जवळ जाऊन विचारपूस सुरू केली असता, पोलिसांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्याला देता आली नाहीत. तो वाहनाची बॅटरी चोरण्याच्या उद्देशाने येथे उभा असल्याचा संशय मुलुंड पोलिसांना होता. त्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. वर्धन घाग असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, तो भांडुपचा रहिवासी आहे. सध्या मुलुंड पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

3D Helpline

सिटीजन रिपोर्टर
78956 78956

होम केबल
022 - 6614 6060

होम नेट
022 - 6621 1333
customerservice@homenet.net

होम टाइम्स
022 - 6614 6050
write2us@hometimes.in

होम टाइम्स आणि होम केबलवर जाहिरात द्या
78957 78957
homecableads@gmail.com

योग्य माहितीसाठी कृपया संबंधित नंबरांवरच संपर्क करा



## जाहिरातींबाबत महत्त्वाची सूचना

साप्ताहिक होम टाइम्समधून जाहिरातदारांच्या विविध प्रकारच्या जाहिराती प्रकाशित केल्या जातात. या जाहिरातीतील मजकुराबाबत सर्वस्वी जबाबदारी जाहिरातदारांची असून त्याबाबत उद्भवणाऱ्या कायदेशीर वा अन्य प्रकरणात साप्ताहिक होम टाइम्सचे व्यवस्थापन, मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक यांच्यासह कोणीही जबाबदार असणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

– मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक




आरोग्य आशा

डॉ. मोनिषा रावत

# 'सुजोक'

# गोखरू (बुनिओन)

उपचार, औषध आणि शस्त्रक्रियेशिवाय

गोखरू वर बराच काळ उपचार न केल्यास, त्यांचा आकार वाढू शकतो आणि नंतर गुडघा ऑस्टियोआर्थरायटिस किंवा हिप बर्साइटिससारख्या समस्या उद्भवू शकतात.

या समस्येला हॉलक्स वॉलंग्स असेही म्हणतात. पायात होणारी सर्वात सामान्य वेदनादायक आजार आहे हा. पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये अधिक या आजाराचे प्रमाण जास्त आहे.

**गोखरू म्हणजे काय?**

ही मोठ्या पायाच्या बोटाची विकृती आहे, ज्यामध्ये एका पायाचे बोट आतील



बाजूस वळते आणि दुसर्या पायाच्या बोटाकडे सरकते किंवा पायाचे हाड बाहेर येते/गाठ होते. मेटाटार्सल हाडाचे डोके मोठे होते आणि पायाला खडबडीत स्वरूप आणि आकार दिसतो. या सूज असलेल्या स्थितीमुळे खूप वेदना आणि अस्वस्थता येते, ज्यामुळे चालण्याची क्षमता, संतुलन राखणे आणि विशिष्ट प्रकारचे शूज घालणे प्रभावित होते.

**लक्षणे :–**

- मोठ्या पायाच्या बोटाच्या बाजूला एक लाल, वेदनादायक उभार दिसून येतो.
- मोठ्या पायाच्या बोटाच्या प्रभावित भागात वेदना, नरमी/कोमलता.
- मोठ्या पायाच्या सांध्याभोवती सूज येणे.
- प्रभावित पायाच्या बोटाची मर्यादित हालचाल.
- नियमित शूज घालण्यात अडचण.

आमच्या 'मोनिषाज मंत्रा' मध्ये आम्ही खालील मार्गांनी लोकांना कोणत्याही औषधाशिवाय, शस्त्रक्रियेशिवाय आणि कोणतेही दुष्परिणाम न करता त्यांचे गोखरू बरे करण्यास मदत करतो.

- नियमित व्यायामामुळे स्नायूंची





ताकद, लवचिकता, वेदना कमी होण्यास आणि पायांची हालचाल सुधारण्यास मदत होते. पोहणे, सायकल चालवणे, चालणे आणि पायाचे व्यायाम केल्याने गोखरू कमी होण्यास मदत होते.
- पाय आणि बोटांवर अतिरिक्त दबाव कमी करण्यासाठी निरोगी शरीराचे वजन राखणे.
- गोखरू ही सुजेची स्थिती असल्याने, परिष्कृत साखर, वातित पेये, जंक आणि प्रक्रिया केलेले पदार्थ इत्यादींसारखे पदार्थ टाळा.
- आरामदायक शूज घालणे.

**सुजोक थेरपी**





- **कलर थेरपी –**

कलर थेरपी – गोखरू वर दररोज केशरी रंग लावणे. (चित्र १ प्रमाणे)

- **ॲक्युप्रेशर –**

मधल्या पायाच्या नखाजवळ (गोखरूच्या बाजूने) निदानात्मक तपासणीद्वारे गोखरूचा वेदनादायक बिंदू शोधा आणि दिवसातून चार वेळा घड्याळाच्या दिशेने–घड्याळाच्या विरुद्ध दिशेने फिरवून मालिश करा. (चित्र २ प्रमाणे)





आंतरराष्ट्रीय सुजोक असोसिएशन (ISA) प्रमाणित कार्यशाळेचे वेळापत्रक : १. ऑनलाइन (आंतरराष्ट्रीय) – सुजोक -Basic (Level-I) १४ ते २२/०९/२०२३, २. ऑनलाइन–सुजोक Six Ki-1 (Level-III) १२ ते २३/१०/२०२३, ३. निवासी, मेरिडियन सुजोक Ki (Level-II) २७ ते २९/१०/२०२३ •Limited Seats Registration on First Cum First Basis.


**Dr.Monisha Rawat - Founder of 'Monisha's Mantra', Mumbai and Global We Care Foundation -**
M.Sc., M.D. (Alternative Medicine), Life Coach, Master in Sujok, Consulting Nutritionist, Corporate Trainer, Holistic Counselor, Sujok Diabetes Specialist, International Lecturer for Sujok & Smile Taiji. ISA Authorized Lecturer for SUJOK Level - I, II, III & IV Award Winner as a BEST PERFORMING TEACHER by International Sujok Association (ISA) – SIC 2019 • National Excellence Health Award - 2019 During COVID-19 • Award winner of International Women Excellence Empowerment Award (WEE) – 2020 as a RISING STAR • Award winner of India Best Therapist Award for the Year 2021 by MKSS • Award Winner of ET CHANGE MAKER-2022 for Health & Wellness powered by Economic Times-Ascent & Navbharat Times
**Award winner of PILLAR OF MAHARSHTRA AWARD-2022, in Association with MahaSEWA.**
**An ISO Certified Centre at Mumbai Mulund- +91 8655139777/ 9029960086, Goregaon - +91 8433947592 / 9820343592**






# आरोग्य आणि मनोरंजन

## टॅरो कार्ड वाचन भविष्य आणि सल्ला


**९ सप्टेंबर २०२३ ते १५ सप्टेंबर २०२३**


सुनिता देसाई २००३ पासून टॅरो रिडींग करतात. ग्रँड मास्टर इन रेकी, फोर लेव्हल्स इन चक्रा मेडिटेशन, मास्टर्स इन मरमा, जीपी इन शियात्सू, क्रिस्टल ॲन्ड पिरॅमिड एक्स्पर्टस, मास्टर्स इन ॲक्युप्रेशरीस्ट, अरोमा थेरपिस्ट, प्रानीक हिलर, औरा हिलर आणि व्हर्च्यू पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटवर दोन पुस्तके लिहिली आहेत. जे गुजराती माध्यमिक शाळेत शिकवले जाते.
संपर्क : ९३२३४३०३५५ e-mail : desaisunita02@gmail.com







■ **मेष** (अ, ल, इ)
परिस्थिती सुधारेल आणि तुम्हाला समाधान वाटेल **सल्ला :** उच्च साध्य करण्यासाठी उच्च विचार करा. जांभळ्या रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या गरजांकडे लक्ष द्या.






■ **कर्क** (ड, च, ह)
या आठवड्यात तुमच्यासाठी काही प्रवास आहे आणि तुम्ही उद्देशाने प्रवास कराल. **सल्ला :** एखाद्या पवित्र ठिकाणी किंवा मंदिराला भेट द्या. लाल रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या शक्तीकडे लक्ष द्या.





■ **तुळ** (र, ट)
तुम्ही तुमचा मार्ग बदलाल आणि नवीन गोष्टी आणि यश सहज मिळेल. **सल्ला :** या आठवड्यात बाहेरचे अन्न खाऊ नका. तपकिरी रंगाच्या गोष्टी वापरा. आपल्या सामर्थ्याकडे लक्ष द्या.





■ **मकर** (ख, ज)
कोणीतरी तुम्हाला मदत करेल आणि तुम्हाला अनेक बाबतीत अधिक सुरक्षित वाटेल. **सल्ला :** तुमच्यासाठी संयम अनिवार्य आहे. केशरी रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या सवयींकडे लक्ष द्या.





■ **वृषभ** (ब, व, य)
पैशाची चढ-उतार असतात आणि जेव्हा तुम्हाला पैसे हवे असतात तेव्हा तुम्हाला ते मिळणार नाही. **सल्ला :** काही ठरवण्यापूर्वी दोनदा विचार करा. केशरी रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या समाधानाकडे लक्ष द्या.






■ **सिंह** (म, ट)
तुम्हाला लोकांवर आणि तुमच्या स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती मिळेल. **सल्ला :** नवीन लोकांशी जास्त बोलू नका. निळ्या रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या भावनांकडे लक्ष द्या.





■ **वृश्चिक** (न, य)
तुम्हाला काही रहस्ये कळतील आणि तुम्ही निर्णय घेण्यास सक्षम असाल. **सल्ला :** काही गरजू व्यक्तींना धान्य दान करा. राखाडी रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या रागाकडे लक्ष द्या.






■ **कुंभ** (ग, स, श)
या आठवड्यात तुमचा व्यावसायिक मार्ग तुम्हाला खूप मदत करेल. तुम्हाला काही संधी मिळतील. **सल्ला :** आपल्या जेवणाची काळजी घ्या आणि नियमित रहा. निळ्या रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या सहकार्याकडे लक्ष द्या.





■ **मिथुन** (क, च, ज)
तुमचे बोलणे तुमची शक्ती बनेल आणि कोणीतरी तुमची प्रशंसा करेल. **सल्ला :** जा आणि काही वृद्ध नातेवाईकांना भेटा. राखाडी रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या विश्रांतीकडे लक्ष द्या.





■ **कन्या** (प, ठ, ण)
तुम्ही या आठवड्यात गोंधळात राहाल कारण गोष्टी खूप वेगाने बदलतील. **सल्ला :** ज्या लोकांचा तुम्ही आदर कराल त्यांच्या आज्ञा पाळा. जांभळ्या रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या भावनांकडे लक्ष द्या.





■ **धनु** (भ, ड, फ, ट)
तुमची सध्याची स्थिती लवकरच बदलेल आणि आरोग्य आणि संपत्ती सुधारेल. **सल्ला :** मत देण्यापूर्वी दोनदा विचार करा. जांभळ्या रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या जबाबदाऱ्यांकडे लक्ष द्या.





■ **मीन** (द, च, झ)
बरेच लोक तुम्हाला चुकीचे सिद्ध करण्यासाठी तुमच्याशी वाद घालतील. **सल्ला :** शांततेसाठी तुम्हाला नियमित ध्यान आवश्यक आहे. तुमच्या जेवणात आणि कपड्यांमध्ये हिरवा रंग वापरा. तुमच्या ज्ञानाकडे लक्ष द्या.

# भरधाव गाडी चालवणाऱ्या डिलिव्हरी बॉयने दिली महिलेला धडक

## महिला जखमी, आरोपी अटक

■ होम टाइम्स टीम

मुलुंड पूर्व येथे भरधाव दुचाकीस्वाराने पायी जात असलेल्या महिलेला धडक दिल्याची घटना घडली आहे. या घटनेत दुचाकीस्वाराला नवघर पोलिसांनी अटक केली आहे. तो मात्र इतर डिलिव्हरी बॉईजचे काम करत आहे. त्यामुळे त्याच्यासारखे अनेक डिलिव्हरी बॉईजकडून असे कृत्य घडत आहे. म्हणून त्यांच्यावर कठोर कारवाई क्लीन जावी अशी मागणी नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे.

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जुनीता देसाई या मुलुंड पूर्व येथील आनंद नगर येथील रहिवासी आहे. ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता ती काम आटोपून घराकडे जात होती. दरम्यान मागून भरधाव वेगाने आलेल्या दुचाकीने तिला धडक दिली. धडक देणारा दुचाकी चालक घटनास्थळावरून पसार होण्याचा प्रयत्न केला. मात्र परिसरात उपस्थित असलेल्या जागृत लोकांच्या मदतीने पकडण्यात आले. या घटनेत महिला गंभीर जखमी झाली असून तिला उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यानंतर नवघर पोलिसांना याबाबतची माहिती देण्यात आली. पकडण्यात आलेला बाईक चालक निलेश पेडणेकर (२०) याच्यावर भादंवि कलम २७९, ३३८ आणि मोटार वाहन कायदा १८१ आणि १८४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

निलेश डिलिव्हरी बॉय आहे. मुलुंड आणि आजूबाजूच्या परिसरात खाद्यपदार्थ तसेच इतर वस्तू पोहोचवणारे बाईक चालक अनेकदा शक्य तितक्या लवकर पोहोचवण्यासाठी अतिवेगाने किंवा उतावीळपणे गाडी चालवताना दिसतात. त्यामुळे अनेकदा अशा घटना घडतात. अशा वाहनचालकांवर कठोर कारवाई करायला हवी अशी मागणी नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे.

# मुलुंडमध्ये गौतमी पाटीलच्या कार्यक्रमात राडा

## महिलेची छेड काढणाऱ्याला दिला चोप

■ होम टाइम्स टीम

गौतमी पाटीलचा कार्यक्रम आणि राडा हे समीकरण आता नवीन नाही. ज्या ठिकाणी गौतमी पाटीलचे लावण्याचे कार्यक्रम होतात त्या ठिकाणी हुल्लडबाजी करणाऱ्यांमध्ये राडे झालेले दिसून आले आहेत. मुलुंडमध्येही तिच्या एका कार्यक्रमात असा प्रकार घडला. मात्र हुल्लडबाजी करू पाहणाऱ्या तरुणाला इतर तरुणांनी चांगलाच चोप दिला.

गौतमी पाटील ही नर्तकी लावण्यांवर करत असलेल्या नृत्याने तरुणाईला वेड लावले आहे. त्यामुळे तिच्या कार्यक्रमाला तरुणाई मोठ्या संख्येने उपस्थित राहते. तिची तरुणाईमधील प्रसिद्धी पाहता मुलुंडमध्येही एका दही हंडी उत्सवात तिला पाचारण करण्यात आले होते. मुलुंड पश्चिमेतील स्वप्नगरी या ठिकाणी ती आली होती. ८:३०च्या दरम्यान तिच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. तिला पाहण्यासाठी आलेल्या गर्दीला आवरण्यासाठी पोलिसांनी मोठा पोलीस बंदोबस्त लावला होता. या गर्दीत तरुणांची संख्या जास्त होती. कार्यक्रम सुरू झाल्यानंतर अचानक स्टेजच्या समोरील भागात घोळक्यातून आलेल्या एका हुल्लडबाज तरुणाने एका महिलेची छेड काढली. त्याचे हे घाणेरडे कृत्य पाहून बाजूला असलेल्या लोकांनीत्याला बेदम झोप दिला. गोविंदा पथक काही तरुणांनी सुद्धा मारहाण केली. त्यामुळे अचानक झालेल्या या घटनेमुळे पोलिसांची धावपळ उडाली. काही काळ या ठिकाणी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. आयोजकांकडून अनाउन्समेंट करत या गर्दीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न देखील झाला. दरम्यान या कार्यक्रमात हुल्लडबाजी करणारे तरुण कोण होते याचा तपास आता मुलुंड पोलीस करत आहेत.

# पार्क केलेल्या वाहनाची काच फोडून चोराने ७० हजारांचा लॅपटॉप चोरला

■ होम टाइम्स टीम

मुलुंडमध्ये भरदिवसा वाहनाची काच फोडून आतमध्ये ठेवलेले ७० हजार रुपयांहून अधिक किमतीच्या ऐवजाची चोरी झाल्याची घटना मुलुंडमध्ये उघडकीस आली आहे. या घटनेनंतर मुलुंड पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

मुलुंड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ४२ वर्षीय सागर काळे हा कांजूरमार्ग येथील रहिवासी आहे. तो ६ सप्टेंबर रोजी सकाळी कामानिमित्त मुलुंड येथे आला होता. दरम्यान, त्याने आपली चारचाकी मुलुंड पश्चिम पीके रोडवर उभी केली होती. काही वेळाने तो काम आटोपून कारजवळआला असता त्याला कारची काच तुटलेली दिसली. आत डोकावून पहिले असता कारमध्ये ठेवलेला ७० हजार रुपये किमतीचा लॅपटॉपही गायब होता. ही घटना भरदिवसा घडली. त्याने मुलुंड पोलिस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली. त्याने दिलेल्या माहितीनुसार मुलुंड पोलिसांनी भादंवि कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. याआधीही मुलुंड आणि परिसरात वाहनांच्या काचा फोडून मौल्यवान वस्तू चोरीच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. काचा फोडून चोरीच्या वाढत्या घटना पाहता मुलुंड पोलिसांनी नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तू वाहनात न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# मुलुंडमध्ये सायबर गुन्ह्यांची मालिका थांबेना

## मुलुंडकर तरुणीला घातला १.५३ लाखांचा गंडा

■ होम टाइम्स टीम

मुलुंडमध्ये सायबर गुन्ह्यांची मालिका थांबण्याचे नाव घेईनासे झाले आहे. सरासरी रोजच अशा प्रकारचे गुन्हे घडत आहेत. टेलिग्रामद्वारे टास्क खेळून, यूट्यूबचे सदस्यत्व घेऊन पैसे कमावण्याच्या नावाखाली बेरोजगारांची फसवणूक होत आहे. अशीच आणखी एक घटना मुलुंडमध्ये उघडकीस आली असून महिलेची दीड लाखांहून अधिक रुपयांची लुबाडणूक झाली आहे.

मुलुंड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ३२ वर्षीय तक्रारदार मुलुंड पश्चिम येथील रहिवासी आहे. ४ वर्षांपूर्वी तिने कामाच्या संदर्भात परीज़ीळ.लो वर बायोडाटा अपलोड केला होता. त्यानंतर काही दिवसांपूर्वी तिला एका अनोळखी नंबरवरून फोन आला. ज्यामध्ये सीता नावाच्या महिलेने तिला सांगितले की, यूट्यूबवर चॅनल सबस्क्राईब करून ती घरी बसून चांगले पैसे कमवू शकते. हे काम करण्यासाठी तिला टेलिग्राम ग्रुपमध्ये सहभागी होण्याची लिंकही देण्यात आली होती. तिने लिंकवर क्लिक केले आणि घरी बसून पैसे कमावण्याच्या लोभापायी नोंदणी केली. यानंतर तिला विविध कामे देण्यात आली. सुरुवातीची काही कामे केल्यानंतर तिला पैसे परत मिळत होते. नंतर तिला पेड टास्क करण्यास सांगितले आणि त्याबदल्यात चांगला नफा देण्याचे आमिषही देण्यात आले. या लालसेपोटी तिने पेड टास्क सुरू केले. फसवणूक करणाऱ्यांनी तीच्या खात्यातून १ लाख ५३ हजार ७५० रुपये काढण्यात आले. पुन्हा पैसे न मिळाल्याने पीडितेला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने तिने तात्काळ मुलुंड पोलीस ठाणे गाठले. सध्या पोलिसांनी आयपीसी कलम ४१९, ४२० अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. याबाबत पोलीस प्रशासनाकडून नागरिकांना वारंवार सावध राहण्याचे आवाहन केले जाते. ऑनलाईन व्यवहार, कामे करताना काळजी घेण्यास सांगितली जाते. मात्र तरीही सायबर कडून फसवणूक होण्याचे प्रकारच्या कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. यामुळे नागरिकांनीही पोलीस प्रशासनाला याबाबत अधिक जास्त प्रमाणात जनगृती करण्याची विनंती केली आहे. त्याबाबत सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात उपयोग करून घ्यायला हवा असेही पोलिसांना सुचविण्यात आले आहे.

CALL CENTER
**022 66211333**

E-MAIL ID
**customerservice@homenet.net**

FACEBOOK MESSENGER
**HomeNet / @homenet.net**

**Facebook Messenger Scan Code**:
To get in touch, simply scan
a code using the Messenger app.

**HOME NET**
**www.homenet.net**

WOW!

DOUBLE MAZZA!!
uploads & downloads
at same speed, since 2010
now @ ₹194/-*

Pay For 6 Months & Get Additional 7 Months Free

67 OFFER

## TRULY UNLIMITED SPEED PLANS

| PLAN NAME | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|
| 20 Mbps Unlimited | 500/- | NOW 231/-* | 3000/- |
| 30 Mbps Unlimited | 600/- | NOW 276/-* | 3600/- |
| 40 Mbps Unlimited | 720/- | NOW 332/-* | 4320/- |
| 50 Mbps Unlimited | 850/- | NOW 392/-* | 5100/- |
| 60 Mbps Unlimited | 985/- | NOW 455/-* | 5910/- |

## UNLIMITED POWER PLANS

| PLAN NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|---|---|
| 40 Mbps till Allotted Data | 250 | 20 Mbps | 600/- | NOW 277/-* | 3600/- |
| 60 Mbps till Allotted Data | 500 | 30 Mbps | 750/- | NOW 346/-* | 4500/- |

UPLOAD OR DOWNLOAD @SAME SPEED
99% UPTIME

- Affordable Rates
- Super speed Upto 100 mbps
- Customer support Android / IOS app
- Online Payments
- Customer care 9 am - 12 midnight

67 PE OFFER

## NEWLY LAUNCHED - FIBER TO THE HOME TECHNOLOGY

HOME FIBER
powered by HomeNet

UNLOCK YOUR SUPERPOWER

## INTRODUCTORY HOME FIBER PACKS

UPGRADE YOUR EXISTING HOME NET TO
NEW FIBERNET EXPERIENCE WITH
ZERO INSTALLATION COST**
For New Customers installation charges of Rs.500/-* applicable

### HOME FIBER TRULY UNLIMITED SPEED PACKS

| PACK NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | EFFECTIVE MONTHLY RATE | 360 DAYS |
|---|---|---|---|---|
| 35 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 337/-* | 4040/- |
| 50 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 421/-* | 5050/- |
| 75 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 505/-* | 6060/- |
| 100 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 589/-* | 7070/- |

Many more Speed Pack options available up to 500 Mbps
** offer available only at the FTTH G / EPON Ready Building

TO AVAIL THIS
INTRODUCTORY OFFER
IN YOUR SOCIETY
PLEASE COME TO US WITH
A MINIMUM GROUP OF
15 CONNECTIONS

SYMMETRIC SPEED
SUPER SPEED PACK UP TO 500MBPS
EASY LOCAL APPROACH FOR ISSUE RESOLUTION
FASTER VISITS FOR TECHNICAL SOLUTIONS
NO VISIT CHARGES FOR ISSUES & COMPLAINTS

Customer Portal **login.homenet.net**
Customer Service Mobile App **Log2Space - HomeNet**
Download on the App Store
GET IT ON Google Play

FOR NEW CONNECTIONS OR QUERIES CALL
**Call - 75067 96562, 88790 00724, 88790 00720, 88794 47839**
**MULUND** - A / 16, Gaurav Annex, R.R.T Road, Mulund (W), Mumbai - 400 080. Tel.: 022 662 11 333

MALAD • COLABA • VASHI • NERUL • THANE • AIROLI • ASANGAON • VASIND

*conditions apply


Printer , Publisher & Owner : **Hemanshu Girish Kothari** & Printed at Dangat Media Pvt. Ltd, Plot No.22, Digha MIDC, Vishnu Nagar, TTC Industrial Area, Digha, Navi Mumbai. Published at G/4, Landmark Appartment, Devidayal Cross Road, Mulund (W), Mumbai - 80.**Home Times** (Office): - 6th Floor, Flora Point, S.N. Road, Near Mulund Court, Mulund (W), Mumbai-80. **Editor : Hemanshu Girish Kothari** ● **RNI No.: MAHMAR/2016/66872**